# वनयोगी भगीरथ ः बाळासाहेब देशपांडे.

अतुल रामचंद्र जोग

१५ऑगस्ट १९४७ ला आपला भारत देश स्वतंत्र झाला. देशात स्वकीयांचे शासन आले.
वर्तमान मध्यप्रदेश ,छत्तीसगढ आणि विदर्भ हा भाग मिळून मध्यप्रांत नावचे राज्य होते.त्याचे मुख्यमंत्री मा. श्री.पंडित रविशंकर शुक्ला हे होते.त्यांच्या मनात विचार आला की, आपल्या प्रांतात भ्रमण करून लोकांशी संपर्क साधावा.लोकांच्या समस्या समजावून घ्याव्यात.आणि त्यांच्या इच्छा आकांक्षा काय आहेत हे विचाराव. सर्व ठीकाणी मुखयमंत्रयांचे स्वागत होइ.लोक हारतुरे देत होते. असे होत होत पंडित शुक्ला जशपुरनगर येथे पोहोचले.परंतु तेथील दृष्य फारच वेगळे होते. लोक हातात काळे झेंडे आणि ‘शुक्लाजी वापस जाओ’ चे फलक हातात घेउन निषेधाला उभे होते.मुख्यमंत्रयांना कळेना, काय झाले ? देशतर नुक्ताच स्वतंत्र झाला.मी पहिलाच मुख्यमंत्री आहे.अजुन काही कामही सुरू झालेले नाही.मग हा विरोध का ? या मागे कोण आहे ? हे लोक असे का करता आहेत ? मग चौकशीअंती कळले की, जशपुरच्या वनवासी क्षेत्रात ब्रिटीश सरकारच्या मदतीने ख्रिश्चन मिशनरी पोहोचले होते.त्यांनी गावोगावी शाळा उघडून शिक्षणाच्या नावाखाली अराष्ट्रीय विचारांचा प्रसार आणि धर्मांतराचे घातक प्रयत्न अनेक वर्षापासून चालवले होते. याचाच परिणाम म्हणून वनवासी बंधुंची दिशाभूल झाली आणि ते मुख्यमंत्रयांना विरोध करायला उद्युक्त झाले.पंडित रविशंकर शुक्ला यांनी तत्कालीन थोर समाज सेवक पू.ठक्कर बापा यांच्याशी या विषयी चर्चा केली.पू ठक्कर बापा यांनी मुख्यमंत्रयांना सांगितले की, या समस्येला एकमेव उपाय म्हणजे ‘सामाजिक सेवाकार्य’ हाच असू शकतो.या कामासाठी राष्ट्रीय विचारांनी प्रेरीत ,सामाजिक संवेदनायुक्त सेवाभावी व्यक्तिची आवस्यकता आहे. मग अशी व्यक्ति कोण आहे ? एकमेव नाव समोर आले ते ॲड.रमकांत केशव (बाळासाहेब) देशपांडे यांचे.

मा.श्री रमाकांत देशपांडे यांचा जन्म २६ डिसेंबर १९१३ रोजी विदर्भातील आर्वी या गावी झाला. ते बालपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते, त्यांना पू. डॉ हेडगेवार यांचा परिसस्पर्श लाभला होता. भारताच्या ऐतिहासिक ‘चलेजाव’ चळवळीत रामटेक शहराचे त्यांनी नेतृत्व कोले

होते.रामकृष्ण मिशनचे शिष्य. विवेकानंद साहित्याचे अभ्यासक आणि विद्वान ॲड. बाळासाहेब यांच्याकडे जेव्हा हा प्रस्ताव आला की जशपूरच्या वनवासी क्षेत्रात सेवा कार्य करायला एका कार्यकर्त्याची आवश्यकता आहे तेव्हा त्यांनी लगेच होकार दिला आणि ते आपली वकिली बंद करून जशपुरला रवाना झाले. पू. ठक्कर बापांनी त्यांना मार्गदर्शन केले आणि एका वर्षानंतर जशपुरला येण्याचे आश्वासन दिले.

१९४८ ला मे महिन्यात ॲडव्होकेट बाळासाहेब देशपांडे जशपुरच्या निबिड अरण्यात पोहोचले. सुरवातीला क्षेत्रीय विकास अधिकारी या नात्याने त्यांची सरकारी पदावर नियुक्ति झाली.गावागावात सरकारी अधिकारी म्हणून फिरताना त्यांच्या लक्षात आले की शिक्षण क्षेत्रातील मिशनरी मक्तेदारी संपवणे आवश्यक आहे म्हणूनच त्यांनी सरकारी शाळांचे गावोगावी जाळे विणणे सुरू कोले. त्या सोबत वनवासी बंधुंची श्रध्दा पाहून जागोजागी महादेव आणि अन्य देवांची मंदिरे उभारून लोकांची श्रध्दा जागृत केली. त्याकाळी रस्ते आणि कोणतीही वाहातुकीची साधने नसताना पायी मैलोन्मैल फिरणारा तेथील वनवासी समाजाची सादरी भाषा बोलणारा ॲडव्होकेट बाळासाहेब हा माणूस वनवासी समाजाला आपला वाटु लागला. १९४९ मधे पू. ठक्कर बापा आपल्या शब्दाप्रमाणे जशपूरमधील प्रगती पाहाण्यास आले. या पहिल्याच एका वर्षात १00 पेक्षा जास्त गावात सरकारी प्राथमिक शाळा सुरू झाल्या होत्या. गावातील वनवासी बंधू भजनातील टाळगजरात रमु लागला होता.गावकरी सर्वत्र ठक्कर बापा यांचे ' भारत माता की जय ' या जयघोषाने स्वागत करत होते.त्यांना सामाजिक बदलाची चाहूल लागली आणि बाळासाहेब आणि त्यांच्या पत्नी सौ प्रभावती यांच्याबद्दल कौतुक वाटले.त्यांनी बाळासाहेबांना दोनशे रूपयांचे बक्षिसही दिले.चार वर्ष काम केल्यावर बाळासाहेबांच्या लक्षात आल की सरकारी नोकरीत राहून आपण अपेक्षित काम करू शकणार नाही .म्हणून त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा देउन वनवासींचा विकास करण्यासाठी सामाजिक संस्था स्थापन करण्यचे निश्चीत केले. जशपुरचे राजे मा. विजयभूषण सिंह देव यांच्या सहकार्याने त्यांनी सन १९५२ मधे 'वनवासी कल्याण आश्रम' या संथेची मुहूर्तमेढ रोविली. मा.मोरूभैय्या केतकर यांच्या पूर्णवेळ सहयोगाने त्यांनी जशपूरमधेच शाळा आणि विद्यार्थिवसतीगृह सुरू केले.आपल्या परिवाराच्या आणि या संस्थेच्या चरितार्थाकरिता त्यांनी जशपुरमधेच वकीली सुरू केली.या काळात गावोगावी जाऊन वनवासींमधे मिसळणे आणि त्यांच्याशी समरस होऊन मिशनरींकडून

वनवासींवर होणाऱ्या अत्याचारांचा प्रतिकार करणे हे काम त्यांनी अविरत केले. पुढील काळात मिशनरी कामांचा आढावा घेण्यासठी , न्यायाधीश भवानी शंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली , नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालातून सत्य बाहेर येण्यासाठी आयोगाने बाळासाहेब देशपांडे यांचीच मदत घेतली.

बाळासाहेब देशपांड यानी वनवासी समाजातील संत, गहिरागुरू यांचा आधार घेउन समाजातील अनिष्टप्रथा नाहिश्या करण्याकरिता जनजागरण केले. स्वामी अमरानंद यांना जशपुरच्या आश्रमात सन्मानाने आणून समाजात धर्मश्रध्दा जागृतीचे काम केले. धन्वंतरी आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून वनवासी गिरीजनांची आरोग्यसेवा चालु केली. हे सर्व काम करताना बाळासाहेबांनी प्रत्येक कामामागे कार्य कर्त्यांची फळी उभी केली. हळु हळु हे काम जवळच्या झारखंड प्रांतातही त्यांनी पसरवले. या संस्थेची प्रसिध्दी कानावर योउन १९७८ साली तत्कालीन पंतप्रधान मा. मोरारजीभाई देसाई यांनी जशपुरच्या आश्रमाला भेट देऊन कामाची प्रशंसा केली. कामाची प्रगती पाहून त्यांनी वनवासी कल्याण आश्रमाला सरकारी मदतही देऊ केली. मा. बाळासाहेब देशपांडे यांनी ही मदत साभार नाकारली आणि आमचे समाजिक काम समाजच्याच आर्थीक बळावर चालेल असे सांगितले. हे ऐकताच मा मोरारजीभाईनीही 'हेच तुमच्या यशाचे गमक आहे' असे उदगार काढले.

मा. बाळासाहेबांना हे काम भारतभर वाढवावयाचे होते आणि या साठी सुरू कोलेल्या देशभर प्रवासात जगदेवरामजी उरांव नावाचा एक उमदा युवक त्यांचा सहयोगी होता. या सर्व प्रवासात त्यांनी देशाच्या ईशान्य भागातील असम, नगालॅंड, मणिपूर, मघालय या सर्व ठिकाणी एकच सूत्र मांडले की वनवासी बंधु जसे आहेत तसे आमचे आहेत. नागलॅंडमधील राणी गाइदिन्ल्यु , मेघालयातील हिप्सनराय आणि त्रिपुरातील अजय देववर्मा यांच्याशी विशेष भेट झाली. विविध ठिकाणि या 'हिंदुफादरला' बघण्यासाठी अनेक लोकांची गर्दी झाली.

मा बळासाहेबांनी ओरीसा , बंगाल , मध्यप्रदेश , बिहार , उत्तरप्रदेश , महाराष्ट्र , गुजरात अशा विविध राज्यांच्या वनवासीक्षेत्रांचा अभ्यास करून कामाची दिशा ठरवली. महाराष्ट्रातील ठाणे जिल्हयातील

चलतवाड या गावी कातकरी समाजातील लेकांना ते भेटले. मुंबईमधील पत्रकारपरिषदेत त्यांनी वनवासी समाज्याच्या समस्या मांडल्या.

२१ एप्रील १९९५ साली अनंतात विलीन होताना .१९५२ मधे सुरू झालल्या ‘वनवासी कल्याण आश्रम ‘ या संस्थेचे काम मा.बाळासाहेब देशपांडे यांच्या अथक प्रयत्नाने संपूर्ण भारतभर पसरले होते.

आज वनवासी कल्याण आश्रम देशातील ५0 हजार गावांशी संपर्क ठेऊन आहे. १७000 प्रकल्प आणि उपक्रम चालवतो आणि १२00 पूर्णवेळ काम करणारे सामाजिक कार्यकर्ते संस्थेत कार्यरत आहेत.या सर्व कार्याचा परीणाम म्हणून शहरी आणि ग्रामीण. वनवासी आणि नगरवासी समाजात समरसता उत्पन्न झाली आहे. या कामामुळे देशाच्या एकात्मतेला मोठे बळ मिळाले आहे. कल्याण आश्रमाचे काम हे राष्ट्रीय कार्य आहे. गेल्या साठ वर्षातील प्रयत्नांमुळे संस्थेचे नांव देशभरातील लोकांना परिचयाचे आहे. या कार्याची गंगा ज्या भगीरथाने समाजात पोहोचवली त्या वनयोगी बाळासाहेब देशपांडे यांच्या जन्माला २६ डिसेंबर २0१३ रोजी १00 वर्षे पूर्ण होत आहेत. आज आवश्यकता आहे ती आपण सर्वांनी या कार्यास हातभार लावून त्यांना आदरांजली देण्याची. मा.वनयोगी बाळासाहेब देशपांडे यांना शतशः प्रणाम.

**Email: Jog_atul@yahoooo.co.in**